**परमाणु उर्जा केन्द्रीय विद्यालय - अणुशक्तीनगर, मुंबई**

**अर्ध-वार्षिक परीक्षा - 2023**

**विषय : मराठी (तृतीय भाषा)** **गुण : 40**

**इयत्ता : 8 वी** **वेळ : 90 मि.**

---

**प्रश्न १ अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही चार)** **4**

1) पहिल्या पावसाची वार्ता कशाने समजते?
2) मी चित्रकार कसा झालो पाठाचे लेखक कोण?
3) आपण सारे एक पाठातील सर्व इंद्रिय कुणाकडे तक्रार घेऊन जातात?
4) लहानपणी पावसात भिजताना कुठले गाणे म्हटले जायचे?
5) कष्टकऱ्यांची वस्ती कुठे आहे?
6) प्रगतीची नव परिभाषा कोणती?

**ब) खालील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात लिहा. (कोणतीही दोन)** **2**

1) चित्र काढण्यासाठी वापरला जाणारा कागद कोणता?
2) आभाळाची लेकरांची आई कोणती आहे?
3) वरंधा घाटात कोणता किल्ला मोठा आहे?
4) नासिका काय काम करते?

**प्र.2. रा.:अ) कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा. (कोणत्याही दोन)** **2**

1) माझे खेड अतिशय............आणि सुसंस्कृत होतं.
(मोठे, निसर्गरम्य).
2) कलागुणांच्या क्षितिजावर.......... पहाट उगवली.
(नवयुगाची, प्रतिभेची)
3) होय महाराज,..........आम्हाला क्षमा करा.
(पोटोबा, मेदुराज)
4) आपण सगळे शरीररूपी राज्याचे.............आहोत.
(सेवक, मालक) .

**ब) कोणत्या एका कवितेच्या ओळी पूर्ण करून लिहा.** **2**

1) ............, नवीन आशा
ही प्रगतीची.............. ,
...................अभ्यासाने
उन्नत बनवू आपुल्या.......... .

2) ....................बळकट बाहू
जगन्नाथ रथ------------------
आस...........नाही आम्हा......... वेगळा नाही.

**प्र.3.रा.:अ): जोड्या लावा.** **2**

| 'अ'गट | 'ब'गट |
|---|---|
| 1) भव्य | 1) युग |
| 2) अमूल्य | 2) मन |
| 3) नवे | 3) शिकवण |
| 4) विशाल | 4) पटांगण. |

**ब) खालील चौकट पूर्ण करा.** **2**

1) पदकुमार आणि हस्तराजाचा निश्चय.

1)____________________2)____________

2) लेखकाने पाठात कलेसंबंधी वर्णिलेले दोन विषय.

1)____________________2)____________

3) पावसाळा सुरू झाल्याच्या लेखकाला जाणवणाऱ्या खुणा.

1)_____________________2)____________

**क) तुमच्या शब्दात उत्तरे लिहा.** **(कोणतेही एक)** **2**

1) पोटाबाबद्दलची तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे तुमच्या शब्दात लिहा?

2) वरंधा घाटातील विहंगम दृश्य तुमच्या शब्दात लिहा?

**प्र. ४.था.:अ) वचन बदला. ( कोणतेही दोन)** **2**

1) ससा        3) शाळा

2) घर        4) वेळ.

**ब) लिंग बदला. (कोणतेही दोन**) **2**

1) राजा        3) वाघ

2) काका        4) कवी

**क) समानार्थी शब्द लिहा ( कोणतेही दोन)** **2**

1) आकाश        3) मनोहर

2) शरीर        4) अरुण.

**ड) विरुद्धार्थी शब्द लिहा (कोणतेही दोन**) **2**

1) अमावस्या        3) गरीब

2) पाप        4) आशीर्वाद.

**प्र. 5.वा.अ) कंसातील सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही तीन**) **3**

1) तप्त सूर्य हा उगवताना फार प्रखर दिसतो.        (विशेषण ओळखा).

2) शाब्बास! चांगले काम केलीस तू        (केवलप्रयोगी अव्यय ओळखा).

3) तो श्यामचा मित्र आहे.        (सर्वनाम ओळखा).

4) शाळा सुंदर आहे.        (क्रियापद ओळखा).

5) राधा ही हुशार मुलगी आहे.        (नाम ओळखा).

**ब) कंसात सांगितल्याप्रमाणे वाक्य प्रकार ओळखा (कोणतेही दोन)** **2**

(प्रश्नार्थी वाक्य/ आज्ञार्थी वाक्य/ उद्गारार्थी वाक्य / विधानार्थी वाक्य).

1) अरेरे ! फार वाईट झाले.

2) तुला खाऊ आवडतो का?

3) मुलांनो अभ्यास करा.

4) ती रोज सकाळी व्यायाम करते.

**क) योग्य त्या ठिकाणी विरामचिन्हे द्या. (कोणतेही एक)** **1**

1. श्वास घेतल्याशिवाय माणूस जगू शकेल का

2. आपण सारे एक आपण सारे एक

**प्र.६वा:अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दहा ते बारा ओळींचा निबंध लिहा.** **5**

1. पावसातील मौज 2. माझी आवडती कला 3. एक रम्य सकाळ.

**किंवा**

तुमच्या मित्राला /मैत्रिणीला पत्र लिहून वाढदिवसासाठी तुमच्या घरी येण्याचे निमंत्रण द्या.

**ब) खालील उतारा वाचून त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

'निसर्ग आमुचा सखा' म्हणून मनुष्य नेहमी निसर्गाचा गौरव करत आला आहे; पण हाच मनुष्य आपल्या अविचारी कृतीने निसर्गाला वेदना देत असतो. कधी तो प्रचंड वृक्ष तोड करतो; कधी हवेत दूषित वायू सोडतो; तर कधी कारखान्यांचे मलीन पाणी नद्यांच्या गोड्या पाण्यात सोडून सारे पाणी दूषित करतो. स्वाभाविकच त्याचा मित्र असलेला निसर्ग त्याच्यावर संतप्त होऊन रुद्र रूप धारण करतो. या निसर्गाच्या संतप्त रूपातूनच मोठ्या प्रमाणात नुकसान होते. कधी भूकंपाच्या रूपात जीवित हानी, तर कधी दुष्काळाच्या स्वरूपात, कधी पावसाळ्यात नदी नाल्यांच्या पुराच्या स्वरूपात मोठ्या प्रमाणात निसर्गाचे नुकसान होते . यातीलच एक रूप म्हणजे भूकंप होय.

सप्टेंबर महिन्याचा शेवटचा दिवस पावसाळा जवळ-जवळ संपत आला होता. शेतातील कामे संपल्यामुळे गावकरी गणपतीच्या सणात रंमले होते. अनंत- चतुर्दशीला गणपतीचे विसर्जन करून ते रात्री आपल्या घरकुलात झोपले होते. अचानक पहाटे जमीन हादरू लागली. भूकंपाचा धक्का त्या गावाला बसला. कोणत्याही प्रकारची जीवित हानी त्या गावात झाली नाही. परंतु आपण थोडा तरी विचार केला आहे का? हाच धक्का जर जास्त प्रमाणात बसला असता तर आज त्या गावातील लोकांचे आणि निसर्गाचे काय झाले असते. त्याचे वर्णन करायची ठरले तरी अंगावर काटा येतो. निसर्गाच्या हनीला मनुष्यच जबाबदार आहे. म्हणजेच वृक्षतोड करणे, नद्यांमध्ये कारखान्याचे खराब पाणी सोडणे, हवेत दूषित वायू सोडणे हे कुठेतरी थांबले पाहिजे. हे थांबले तरच आपला सुंदर निसर्ग वाचेल.

1) गावकरी कोणत्या सणात रंमले होते? 1

2) मनुष्य निसर्गाला कोणकोणत्या स्वरूपात वेदना देतो? **2**

3) निसर्गाच्या संतप्त रूपातून कोणकोणत्या प्रकारचे नुकसान होते? **2**

**किंवा**

गावाला जर भूकंपाचा धक्का बसला असता तर त्या गावात काय काय नुकसान झाले असते, याचे वर्णन तुमच्या शब्दात करा? **5**